नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०९/२०२६ ( मंगळवार )

---

## मोटरपंप चोरीचा गुन्हा उघड, ४ आरोपी अटक,
## ८०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त
## वडोदा पोलीसांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन. एम. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वडोदा पोलीसांनी दिनांक ३१/०८/२०२६ रोजी वडोदा पोलीस स्टेशन येथे दाखल १ मोटारपंप चोरीचा गुन्हा उघड करून ८०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

पोलीस स्टेशन वडोदा नागपुर ग्रामीण येथील दिनांक १९/०८/२०२६ रोजी सारडा इंडस्ट्रियल कंपनी वडोदा येथे कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या कंपनीतील मशिनरीला लागलेल्या ०४ इलेक्ट्रिक मोटरपंप कंपनीचा मागील दरवाजा तोडून चोरी करून घेऊन गेले. अशा तक्रारी वरून पोलीस स्टेशन वडोदा अप. क्रमांक ३०८/२६ कलम ३०५(५), ३३१(३), ३३१(४) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान वडोदा पोलीसांना गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुरावे यांच्या आधारे दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सदर गुन्ह्यातील चोरी गेलेले मोटर पंप हे आरोपी नामे १) मोहम्मद इम्तियाज उर्फ अमजद मोहम्मद राजा खान, वय ३६ वर्ष, राहणार शिवाजी चौक, वडोदा तालुका कामठी २) विशाल सुनील ठोकर, वय २८ वर्ष, राहणार शहीद चौक, वडोदा तालुका कामठी ३) प्रदीप भाऊराव मते, वय २८ वर्ष, राहणार वडोदा तालुका कामठी जिल्हा नागपूर ४) तुषार महादेव बुचके, वय २३ वर्ष, रा. वडोदा तालुका कामठी हे कढोली शिवारात असलेल्या कबाडीच्या दुकानांमध्ये विक्री करण्याकरता येणार आहेत. त्यावरून सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपी यांना ताब्यात घेतले. त्याच्यांकडे गुन्ह्याबाबत कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी दिनांक १९/८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन वडोदा परिसरात सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने आरोपीतांना गुन्हयात अटक करून त्यांचेकडुन **पोलीसांनी पंचासमक्ष ०४ नग इलेक्ट्रीक मोटरपंप किंमती ८०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला.**




# बांग्लादेशी नागरिकास बेकायदेशीर वास्तव्यप्रकरणी आरोपीतांना मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अप क्र. ९५/२०२४ कलम १४ विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६, ६(अ), ३(अ) पारपत्र अधिनियम १९५० सहकलम ३३६(२), ३४०(२), ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १३/०३/२०२४ रोजी पारशिवनी पोलीसांना गोपनीय खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीतील काकडे लॉज ईटगाव येथे बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती पोलीसांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता आरोपी महिला ही वेश्या व्यवसाय करताना मिळुन आली. पोलीसांनी सदर आरोपी महिलेची विचारपुस केली असता तिने बांग्लादेशी नागरिक असल्याचे सांगितले. तिच्याकडे भारतात प्रवेश करण्यासाठी आवश्यक पासपोर्ट अथवा वैध कागदपत्रे आढळुन आली नाहीत. सदर आरोपी महिला ही भारतीय हद्दीत पारपत्राशिवाय अवैधरीत्या प्रवेश करून ह. मु.

कोपरगाव खारघर सेक्टर नं. १०, रायगड येथे तसेच दुसरा आरोपी नामे मोहम्मद लहु शेख, मोहम्मद अयुग शेख, वय ३० वर्ष, रा. पतेशरी, पो. जमरील बांग्लादेश ह. मु. तलोजा नवी मुंबई हा देखील बांग्लादेशी नागरीक असुन तो नवी मुंबई परिसरात अनाधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

**तपासी अधिकारी श्री किशोरकुमार वैरागडे, सहायक पोलीस निरीक्षक यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ३१/०८/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं २२ श्री. के. एच. ठोंबरे यांनी नमुद आरोपींना कलम १४ अ (बी) फॉरेनर ॲक्ट १९४६ मध्ये ०२ वर्ष, ०५ महिने, १० दिवस कारावास व १०,०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास, कलम ६ पासपोर्ट (भारतामध्ये प्रवेश रूल १९५०) मध्ये ०२ वर्ष, ०५ महिने, १० दिवस कारावास, व १०,०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने **ए.पी.पी. श्री राम अनवाने** यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, सहायक पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवनी, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा सुरेश धुर्वे, ब. नं. ८७८ पोलीस स्टेशन पारशिवनी यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ५५ म्हशी जनावरांची सुटका, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ३०/०८/२०२६ रोजी देवलापार पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांना एन एच—४४, जबलपूर ते नागपूर जाणाऱ्या रोडवर जुने पोलीस स्टेशन देवलापार समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान कंटेनर क्र. यु पी—२१/डी टी—३३३२ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता १) चालक नामे मोहम्मद जाकीर मो. नाने, वय २६ वर्ष, रा. हिलाली सराय, ता. जि. संभल, उत्तरप्रदेश, क्लिनर नामे २) रिहान शफीक, वय २७ वर्ष, रा. केती, ता. जि. बागपत उत्तरप्रदेश, मालक नामे ३) मो. अदनाम मो. हनिफ, वय २६ वर्ष, रा. अबूईद पुलकला, ता. जि. संभल उत्तरप्रदेश हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ५५ म्हशी जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी

पंचासमक्ष घटनास्थळावरून कंटेनर क्र. यु पी—२१/डी टी—३३३२ किंमती २,५००,०००/— रूपये आणि ५५ म्हशी जनावरे किंमती १,१००,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,६००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी तिन्ही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ३(५) भा.न्या.सं. सहकलम ११(१), (ई), (डी), (एच) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत फसवणूक करून सोन्याचांदीचे दागिने लंपास करणारी टोळीचा पर्दाफाश, संपुर्ण मुद्देमाल जप्त , रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ३१/०८/२०२६ रोजी रामटेक पोलीस स्टेशन येथे फसवणूक करून सोन्याचांदीचे दागिने लंपास करणारी टोळीचा पर्दाफाश करून सदर प्रकरणी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी गुन्हयातील १०० टक्के मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक २७/०८/२०२६ रोजी यातील फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे तीन अज्ञात इसम हे तांदूळ स्वरूपात भिक्षा मागायच्या उद्देशाने घरी येऊन घरामध्ये बरकत येईल, ‘‘तू आम्हाला सोनं चांदी च्या वस्तू दे’’ असे म्हणून सदर फिर्यादीचे पत्नी याला भूलथापा देऊन ठगवणूक केली. त्यामध्ये दोन ग्रॅम सोन्याचे मनी डोरले, एक ग्रॅम चांदीची पाचवी असा मुद्देमाल ठकवणूक करून चोरून नेला होता. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे अप. क्र. ७७१/२०२६ कलम ३१८ (४), ३१९ (२) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयात तपासादरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील तपास पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेवुन **आरोपी १) पवन राघोजी वाघमारे, वय २० वर्ष, रा. पानउबाळी, पो. मोहपा तालुका कळमेश्वर जिल्हा नागपूर. २) इंद्रपाल काळे, वय २० वर्ष, राहणार पानउबाळी, पो. मोहपा तालुका कळमेश्वर जिल्हा नागपूर ३) विशाल रुपराव सुरपाते, वय १९ वर्षे, रा. मोहपा** यांना पोस्टे पारशिवनी हद्दीतून ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हयाबाबत विचारपूस केली असता आरोपींनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीच्या ताब्यातून गुन्हयात चोरी केलेला संपुर्ण मुद्देमाल किंमती अंदाजे १५,०००/— रूपयाचा जप्त करण्यात आला आहे.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कुही :—** दिनांक ३१/०८/२०२६ रोजी कुही पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी भुपेंद्र चैतराम निमजे, वय २१ वर्ष, रा. पाचपावली रोड निमजे पंटरच्या घराजवळ पाचपावली नागपुर हा हा भोजापुर शासकीय रेस्टहाउस कुही येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. त्यास त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३० गुन्हे नोंद

**दिनांक ३१/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ३० गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०५ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बेला** येथे २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ८ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ३ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ६३०० मिली देशी दारू, ७५८० मिली विदेशी दारू, १३८ लिटर मोहाफुल दारू, १२२५० लिटर मोहाफुल सडवा तसेच वाहन असा एकुण ५,३१,१४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## विविध पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध जुगार खेळणाऱ्यांवर १४ गुन्हे नोंद. एकुण ७०३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ३१/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या तसेच सट्टापट्टीचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ७०३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन मध्ये एकुण १४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत** ०१ आरोपी हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत** वेगवेगळया ठिकाणी ०२ आरोपी हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने ०२ आरोपीविरूद्ध एकुण **०२ गुन्हे** नोंद करण्यात आले. तसेच **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** ०२ आरोपी हे सट्टापट्टीचा जुगार तसेच ०१ आरोपी हा अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने असे एकुण ०३ आरोपींविरूद्ध ०३ गुन्हे नोंद करण्यात आले. **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत** ०१ आरोपी सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत** वेगवेगळया ठिकाणी ०८ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने ०८ आरोपींविरूद्ध ०३ गुन्हे नोंद करण्यात आले. **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** ०३ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत** ०१ आरोपी हा सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** वेगवेगळया ठिकाणी ०२ आरोपी हे सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण ०२ आरोपीविरूद्ध एकुण **०२ गुन्हे** नोंद करण्यात आले.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३१/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी १) दादाराव गणबाजी राउत, रा. गोधनी झिंगाबाई टाकळी २) एथले जॉन मायकल, रा. गोधनी झिंगाबाई टाकळी हे मौजा वाकी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन

करतांना मिळुन आले. **पोस्टे नरखेड अंतर्गत** आरोपी गजानन शामरावजी चरडे, वय ५५ वर्ष, रा. तिनखेडा, तह. नरखेड जिल्हा नागपुर हा मौजा खरसोली शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १५ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १५८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने